# साहित्य कला संस्कृती



## उत्तुंग प्रतिभेचा एक मनस्वी कलावंत चित्र-शिल्पकार श्री. प्रमोद कांबळे

रमेश द. पाटील





कलाविश्वात स्वत:ला झोकून देणारा एक द्रष्टा कलावंत! भव्यदिव्य कलाकृतींचा ध्यास घेतलेला एक सच्चा कलाप्रेमी आणि आपलं ईप्सित साधण्यासाठी ध्यास घेतलेला एक ध्येयव्रती! नगरचे श्री. प्रमोद कांबळे यांचं हे सव्यसाची कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्व. श्री. प्रमोद कांबळे यांचं नाव देशातच नव्हे, तर परदेशातही त्यांच्या या अजोड कलागुणांनी त्यांना प्रशंसलं जातं.

त्यांचं बालपण हरवलं , तरीही त्यांनी अत्यंत कष्टानं, जिद्दीनं आयुष्याला उभारी दिली. हाती कला होती. ध्येय होतं पण संधीच्या शोधात बरीच वर्षं निघून गेली.

मुंबईच्या जे. जे. कला महाविद्यालयातून जी. डी. आर्ट झाल्यानंतर त्यांनी मुंबईत अनेक उमेदवाऱ्या केल्या. बारेमाप कष्ट केले पण यश काही हाती लागत नव्हतं.

शेवटी त्यांनी मनाशी निश्चय केला. आपल्या मातृभूमीत प्रस्थान ठेवलं. ते नगरला आले.







श्री. प्रमोद कांबळे यांचं नगरमधील वास्तव्य यशस्वी ठरलं. इथंही सुरुवातीला खूप मेहनत घ्यावी लागली, परंतु असीम इच्छेच्या जोरावर त्यांनी परिस्थितीवर मात केली आणि अक्षरश: शून्यातून विश्व निर्माण केलं. आज नगरला पर्यटनाच्या दृष्टीनं ऐतिहासिक मोलाचा चांदबिबीचा किल्ला प्रवाशांचं आकर्षण आहे. दुसरं महत्त्वाचं म्हणजे मिलिटरी इंजिनियरिंग संस्थेच्या आवारातील देश-विदेशातील भारतीय युद्धात सहभाग असलेल्या लष्करी रणगाड्यांचं भव्य प्रदर्शन पर्यटकांचं लक्ष वेधून घेतं. त्याचप्रमाणे नगरमधील आवर्जून पाहण्यासारखं चित्र-शिल्पकार प्रमोद कांबळे यांचं खासगी 'कलाश्री चित्र-शिल्प दालन' आणि त्यांचा भव्य शिल्प स्टुडिओ.

हे सारं त्यांचं कलावैभव पाहिलं की, चित्रकार प्रमोद कांबळे यांच्या जिद्दीचं आणि कर्तबगारीचं कौतुक करावं तेवढं थोडंच.

अजरामर कलाकृतींचं प्रमोद कांबळे यांनी सामाजिक बांधिलकीतून सार्वजनिक क्षेत्रांत वैशिष्ट्यपूर्ण योगदान दिले आहे. नगर महापालिकेच्या महावीर कलादालनातील ७० फूट × २० फूट आकाराच्या भिंतीवर नानाविध क्षेत्रांतील ५०० भारतीय सुपुत्रांचे आगळेवेगळे पेन्सिल स्केच त्यांनी सलग ७२ दिवस– म्हणजे १ हजार ७२८ तास रेखाटन करून



भिंतीवर ही अमर कलाकृती निर्माण केली आहे. इथं सामाजिक, संगीत, धर्म, विज्ञान आदी क्षेत्रांत आपला कर्तृत्ववान इतिहास घडविणाऱ्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वांचे 'सारे जहांसे अच्छा' असे विलोभनीय दर्शन होते. भारतीय पर्यटकच नव्हे, तर परदेशातील पर्यटकही इथं आवर्जून भेट देतात.

नगरमध्ये विविध उपक्रम व कार्यक्रमानिमित्ताने येणाऱ्या मान्यवरांची चित्र-शिल्पे तयार करण्याचा उपक्रम त्यांनी राबवला. यानिमित्तानं त्यांच्या थोरा-मोठ्यांशी ओळखी झाल्या. शास्त्रज्ञ जयंत नारळीकर,





चित्रपट दिग्दर्शक श्याम बेनेगल, राजदत्त, व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण, शृंगेरी विद्यातीर्थाचे आद्य शंकराचार्य, माजी राज्यपाल पी. सी. अलेक्झांडर, शरद पवार, लालकृष्ण अडवाणी, पंडित भीमसेन जोशी, मधू दंडवते आदी विभूती त्यांच्या चित्र-शिल्पाने थक्क झाल्या. त्यांनी तोंडभरून त्यांचं कौतुक केलं.

नगर येथील आर्म्ड कोअर सेंटर अँन्ड स्कूलच्या मुख्यालयातील प्रमोद कांबळे यांनी तयार केलेले १२ फूट उंचीचे 'कॅव्हलरी स्पिरिट' हे शिल्प नगरमधील शिल्पकलेचा मानबिंदू आहे. शिल्पाची गतिमानता आणि प्रमाणबद्ध नजाकता और आहे. 'एम आय आर सी'चा गौरवशाली इतिहास दाखविणारे 'द स्पिरिट' हे पेन्सिल चित्र १२० फूट × १० फूट भिंतीवर याच काळात रेखाटले आहे.



या जातिवंत कलावंताच्या आयुष्यातील भरभरून आनंदच देणारे नव्हे, तर देश-विदेशातून कौतुक मिळवून देणारे भव्य काम म्हणजे मध्यप्रदेशातील चित्रकूट येथे त्यांनी उभारलेली 'नन्ही दुनिया'.

नानाजी देशमुख यांच्या कल्पनेतील आई व मूल ही संकल्पना घेऊन वात्सल्यपूर्ण प्राणिशिल्प असणारे, हे प्राणिदर्शन इतके सुंदर झाले आहे की, तेथील विविध प्राण्यांची हुबेहूब प्रतिकृती पाहून तत्कालीन राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अतिशय खूष झाले व त्यांनी प्रमोद कांबळे यांना भेटायला बोलावून त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले.



कांबळे यांच्या एकापेक्षा एक सरस कलाकृती त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष देतात. आपल्याला त्या आनंद देतात.

त्यांनी नांदेड शहरात 'गुरू दा गद्दी' सोहळ्यानिमित्त अनेक कामे केली. त्यांची श्री साईबाबा संस्थान, शिर्डी येथे





प्रसादालयासमोरील श्री साईबाबांची फायबरमधील कलाकृती जिवंत शिल्पाचा नमुना आहे. बुलढाणा जिल्ह्यात नानीज येथे नरेंद्र स्वामी यांच्या मठामध्ये उभारण्यात आलेल्या मंदिरावर दिमाखात गरुडावर विराजमान झालेल्या विष्णूची फायबरमधील भव्य आकर्षक मूर्ती पाहणाऱ्याचे लक्ष वेधून घेते. या साऱ्या



असताना चिलिया बाळ व उडणारा हनुमान या पुठ्यांतील फ्रेम्स, 'मायकल अँजेलो'च्या पुस्तकातून रेखाटलेली पियत्रा, डेव्हिड व गुलाम ही शिल्पचित्रे, क्रिकेट सामन्याच्या प्रसंगी क्रिकेटपटूंची रेखाचित्रे, श्रीकृष्ण- कालियामर्दन शिल्प, प्रभात मंदिरावर झळकणारे तुतारी-सुंदरीचे शिल्प, 'सिलसिला' चित्रपटासाठी ४० फुटी पोस्टर रंगविताना त्यात तब्बल ३७ फुटी रेखाटलेला अभिनेता बच्चनचा चेहरा हे सारं त्यांना नव्या कामाची उमेद देते.

सतत आपल्या कामात व्यग्र असतानाही त्यांच्या मनातील काही संकल्पना पूर्ततेसाठी त्यांचा ध्यास आहे. प्रमोद कांबळे म्हणतात, - ''नगरचा विकास एक पर्यटनस्थळ म्हणून करायचा आहे. त्याकरिता नगरमधील एक चौक मी दत्तक घेतला आहे. तिथं मला असं भव्य स्कल्पचर उभारायचं आहे की, ते फक्त कलाकारांसाठी असेल. म्हणजे नृत्य, वाद्य, चित्रकला, लेखन यांचा सुरेख संगम तिथं असेल. शहरातील मोकळ्या भिंती रंगवून या शहराची ओळख निर्माण करणारी कलर सिटी व्हायला





कामांनी त्यांना मान-सन्मान मिळवून दिला आणि पैसाही मिळवून दिला.

आजपर्यंत प्रमोद कांबळे यांना त्यांच्या काही कलाकृती पुन:प्रत्ययाची अनुभूती देऊन जातात. शाळेत

**चित्र-शिल्पकार प्रमोद कांबळे**

* जन्म : ११ ऑगस्ट १९६४
* मूळगाव : संवत्सर (ता. कोपरगाव)
* शिक्षण : जी. डी. आर्ट (सुवर्णपदक)
* सदस्य : महाराष्ट्र तांत्रिक शिक्षण मंडळ (अभ्यासक्रम समिती)
* सदस्य : राज्यस्तरीय कला प्रदर्शन
* परीक्षक पॅनल : कला संचालनालय
* सदस्य : रोटरी क्लब, नगर
* संस्थापक : कलाजगत-न्यास, नगर
* संचालक : कलाश्री क्रिएशन्स कंपनी
* सदस्य : मतिमंद शाळा, नगर
* सदस्य : रचना कला महाविद्यालय, नगर
* सदस्य : सुनीता चित्रकला महाविद्यालय श्रीरामपूर

**पुरस्कार व सन्मान**

* 'द स्पिरिट' व 'वॉर मेमोरिअल' याबद्दल भारतीय लष्कराकडून सन्मान.
* चित्रकूट 'नन्ही दुनिया' प्राणिशिल्प तयार करण्याबाबत राष्ट्रपतींकडून सन्मान.
* बॉम्बे आर्ट सोसायटीकडून पुरस्कार
* सीड प्रदर्शन पुरस्कार
* अशोक जैन पुरस्कार
* 'सावेडी'भूषण नगर पुरस्कार

असे आतापर्यंत ३२ पुरस्कार लाभले आहेत.

हवी.

स्थानिक लोकजीवनाचं दर्शन घडविणारं देशोदेशीच्या मास्कचं म्युझियम, गुरुकुल पद्धतीचं कलाजगत आणि एक भव्य आर्ट गॅलरी, ही माझी मोठी स्वप्नं आहेत आणि माझ्या पद्धतीनं ती मी पुरी करणारच.''

श्री. प्रमोद कांबळे यांची ही स्वप्ने प्रत्यक्षात साकार होवोत आणि देशोदेशी त्यांचा सन्मान होवो या शुभेच्छा!

**श्री. प्रमोद कांबळे**

कलाश्री क्रिएशन प्रा. लि.
कलाश्री, गुलमोहर रोड,
अहमदनगर ४१४००३
दूरध्वनी : +९१-२४२६८९१,
टेलेक्स : +९१-२४१२४२१७८४

**पुणे कार्यालय**
पुणे दत्तमंदिर चौकाजवळ, लुंकड रियल्टी
ऑफिससमोर, विमाननगर, पुणे ४११०१४
दूरध्वनी : +९१-९८२२८७९०५६
email : kalashree e kalashree.com.
kalashree creations egmail.com
www. kalashree.com

■■■